राज्यसेवा पूर्व परीक्षा
STATE SERVICES PRELIMINARY EXAMINATION

-: परीक्षा योजना :-

पेपर क्रमांक	गुण	कालावधी	मानक	माध्यम	पेपरचे स्वरुप
पेपर - I (अनिवार्य)	२००	२ तास	पदवी	मराठी व इंग्रजी	वस्तुनिष्ट/ बहुपर्यायी
पेपर - II (अर्हताकारी)	२००	२ तास	घटक क्रमांक (१) to (५) पदवी स्तर घटक क्रमांक (६) दहावी स्तर घटक क्रमांक (७) दहावी/बारावी स्तर		

टीप - सामान्य अध्ययन पेपर क्रमांक २ (CSAT) हा अर्हताकारी (Qualifying) असून अर्हताप्राप्त करण्यासाठी किमान ३३% गुण मिळविणे आवश्यक राहील. या पेपरमध्ये किमान ३३% गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारांची पेपर क्रमांक १ मधील गुणांच्या आधारे राज्यसेवा मुख्य परीक्षेसाठी गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

नकारात्मक गुणदान:- पेपर क्रमांक १ करीता व पेपर क्रमांक २ मधील "Decision making & Problem Solving" चे प्रश्न वगळून उर्वरित प्रश्नांकरिता नकारात्मक गुणदान लागू राहील.

१) प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/ कमी करण्यात येतील.
२) एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अथवा ज्या उमेदवाराने उत्तरपत्रिकेत पूर्ण वर्तुळ चिन्हांकित केले नसेल अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील.
३) वरीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच राहील व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.
४) एखाद्या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरितअसेल तर, अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

अभ्यासक्रम

पेपर - एक (२०० गुण)	
(१)	राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या चालू घडामोडी.
(२)	भारताचा इतिहास व भारतीय राष्ट्रीय चळवळ. महाराष्ट्राच्या भारांशासह.
(३)	महाराष्ट्र, भारत व जगाचा भूगोल- महाराष्ट्राचा, भारताचा व जगाचा प्राकृतिक, सामाजिक, आर्थिक भूगोल.
(४)	भारत आणि महाराष्ट्र- राज्यशास्त्र व प्रशासन – संविधान, राजकीय प्रणाली, पंचायती राज, नगर प्रशासन, सार्वजनिक धोरण, हक्क विषयक प्रश्न इत्यादी.
(५)	आर्थिक व सामाजिक विकास-शाश्वत विकास, दारिद्रय, समावेशन, लोकशाही, सामाजिक क्षेत्रातील उपक्रम इत्यादी.
(६)	पर्यावरण पारिस्थितीकी, जैव विविधता आणि हवामान बदल यांवरील सर्वसाधारण प्रश्न- याला विषय विशेषज्ञांची गरज नाही.
(७)	सामान्य विज्ञान

Paper II….

पेपर दोन (२०० गुण)	
(१)	आकलन
(२)	संवाद कौशल्यांसह आंतर व्यक्तिगत कौशल्य.
(३)	तर्कशुद्ध तर्क आणि विश्लेषणात्मक क्षमता
(४)	निर्णय क्षमता आणि समस्या निराकरण.
(५)	सर्वसाधारण मानसिक क्षमता
(६)	मूळ संख्याता (अंक आणि त्यांचे संबंध, परिमानाचा क्रम इत्यादी) (इयत्ता दहावी स्तरावरील), विदा अनुयोजन (तक्ता, आलेख, कोष्टक, विदा पर्याप्तता इत्यादी- इयत्ता दहावी स्तरावरील)
(७)	मराठी आणि इंग्रजी भाषा आकलन कौशल्य (इयत्ता दहावी / बारावी स्तरावरील)

टीप- १ : इयत्ता दहावी/ बारावी स्तरावरील मराठी आणि इंग्रजी भाषा आकलन कौशल्याची तपासणी (पेपर २ च्या अभयासक्रमातील शेवटचा भाग) प्रश्नपत्रिकेत उलट भाषांतर न देता, मराठी आणि इंग्रजी भाषेतील परिच्छेदामार्फत करण्यात येईल.

टीप- २ : प्रश्न बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रकारचे असतील.

टीप- ३ : मूल्यमापनाच्या प्रयोजनासाठी राज्यसेवा (पूर्व) परीक्षेच्या दोन्ही पेपरला उमेदवारांनी बसणे अनिवार्य आहे. राज्यसेवा (पूर्व) परीक्षेच्या दोन्ही पेपरला तो/ ती बसला नाही तर अशा उमेदवाराचा मूल्यमापनासाठी विचार करण्यात येणार नाही.

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

राज्यसेवा मुख्य परीक्षा

-: परीक्षेची योजना :-

(१)	लेखी परीक्षा	१७५० गुण (प्रश्नपत्रिका संख्या-०९)
(२)	मुलाखत व व्यक्तिमत्व तपासणी	२७५ गुण
	एकूण गुण	२०२५ गुण.

पेपर क्रमांक व विषय संकेतांक	विषय	गुण	मानक	माध्यम	कालावधी	अर्हताकारी /अनिवार्यता	प्रश्नपत्रिकेचे स्वरूप
पेपर १ (संकेतांक -१००१)	मराठी	३००	दहावी	मराठी	३ तास	२५% गुणासह अर्हताकारी	वर्णनात्मक / पारंपारिक
पेपर २ (संकेतांक -१००२)	इंग्रजी	३००	दहावी	इंग्रजी	३ तास		
गुणवत्तेसाठी गणना करावयाचे पेपर्स							
पेपर ३ (संकेतांक-१००३)	निबंध	२५०	पदवी	मराठी/ इंग्रजी	३ तास	अनिवार्यता	वर्णनात्मक / पारंपारिक
पेपर ४ (संकेतांक-१००४)	सामान्य अध्ययन -०१	२५०	पदवी	मराठी/ इंग्रजी	३ तास		
पेपर ५ (संकेतांक-१००५)	सामान्य अध्ययन -०२	२५०	पदवी	मराठी/ इंग्रजी	३ तास		
पेपर ६ (संकेतांक-१००६)	सामान्य अध्ययन -०३	२५०	पदवी	मराठी /इंग्रजी	३ तास		
पेपर ७ (संकेतांक-१००७)	सामान्य अध्ययन -४	२५०	पदवी	मराठी /इंग्रजी	३ तास		
पेपर ८	वैकल्पिक विषय पेपर क्र. ०१	२५०	पदवी	मराठी /इंग्रजी	३ तास		
पेपर ९	वैकल्पिक विषय पेपर क्र. ०२	२५०	पदवी	मराठी /इंग्रजी	३ तास		

टीप:

१. पेपर क्रमांक ३ ते ७ साठी, उमेदवाराला प्रश्नपत्रिकेतील उत्तरे मराठी किंवा इंग्रजी मध्ये देण्याचा पर्याय उपलब्ध असेल.

२. वैकल्पिक विषयांतील ज्या पेपरसाठी मराठी व इंग्रजी माध्यम नमूद केले असेल त्याच भाषेतून म्हणजेच एकतर मराठी किंवा इंग्रजीतून उत्तरे देता येतील. ज्या विषयांचे माध्यम इंग्रजी असे नमूद केले आहे त्या विषयातील उत्तरे केवळ इंग्रजी भाषेतूनच द्यावी लागतील.

३. मुख्य परीक्षेचे ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज भरताना पेपर लिहिण्याचे माध्यम उमेदवारांना निवडावे लागेल याची त्यांनी नोंद घ्यावी.

४. वरील नियमांचे अनुपालन न केल्यास त्यांच्या उत्तरपत्रिकांचे अनधिकृत माध्यम म्हणून मूल्यमापन करण्यात येणार नाही

५. प्रश्नपत्रिका मराठी व इंग्रजी भाषेत तयार करण्यात येतील. (भाषा प्रश्नपत्रिका, मराठी साहित्य आणि इंग्रजी म्हणून नमूद केलेल्या माध्यमातून विषय वगळून)

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

पेपर - १ (३०० गुण)
मराठी भाषेचा अर्हताकारी पेपर

महत्त्वाच्या गद्याचे वाचन आणि आकलन क्षमता, मराठी भाषेत स्पष्टपणे आणि अचूकरित्या कल्पना स्पष्ट करण्याची उमेदवारामधील क्षमता तपासणे हे या पेपरचे उद्दिष्ट आहे.

प्रश्नांचे स्वरूप स्थूलमानाने पुढीलप्रमाणे असेल:-

(एक) दिलेल्या परिच्छेदांचे आकलन
(दोन) संक्षिप्त लेखन
(तीन) परिपाठ आणि शब्दसंग्रह
(चार) लघु निबंध
(पाच) इंग्रजी ते मराठी आणि मराठी ते इंग्रजी भाषेत अनुवाद.

हा पेपर अर्हताकारी स्वरूपाचा असेल. या पेपरमधील गुण मानांकनासाठी मोजण्यात येणार नाहीत.

पेपर - २ (३०० गुण)
इंग्रजी भाषेचा अर्हताकारी पेपर

महत्त्वाच्या गद्याचे वाचन आणि आकलन क्षमता, इंग्रजी भाषेत स्पष्टपणे आणि अचूकरित्या कल्पना स्पष्ट करण्याची उमेदवारामधील क्षमता तपासणे हे या पेपरचे उद्दिष्ट आहे.

प्रश्नांचे स्वरूप स्थूलमानाने पुढीलप्रमाणे असेल:-

(एक) दिलेल्या परिच्छेदांचे आकलन
(दोन) संक्षिप्त लेखन
(तीन) परिपाठ व शब्द संग्रह
(चार) लघु निबंध
हा पेपर अर्हताकारी स्वरूपाचा असेल. या पेपरमधील गुण मानांकनासाठी मोजण्यात येणार नाहीत.

पेपर - ३ (२५० गुण)
निबंध

उमेदवारांनी निबंधाच्या पेपरमध्ये बहुविध विषयांवर निबंध लिहिणे आवश्यक असेल. निबंधाच्या विषयाची सुसंगत मांडणी करणे, क्रमवार संकल्पनांची मांडणी करणे आणि संक्षिप्त लेखन करणे त्यांचेकडूनअपेक्षित आहे.

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

पेपर - ४ (२५० गुण)

सामान्य अध्ययन :- १

भारतीय वारसा आणि संस्कृती, इतिहास आणि जागतिक भूगोल महाराष्ट्राच्या काही भारांशासह

भारतीय संस्कृतीमध्ये प्राचीन ते आधुनिक काळापर्यंत असलेली कलेची रूपे, साहित्य व स्थापत्य कला यांच्या ठळक पैलूंचा समावेश केला राहील.
महाराष्ट्रातील संत चळवळीच्या विशेष संदर्भात भक्ती चळवळ आणि त्याचे तत्त्वज्ञान.
आधुनिक भारताच्या इतिहासातील अठराव्या शतकाच्या मध्यापासून आजपर्यंतच्या महत्वपूर्ण घटना, महत्वपूर्ण व्यक्ती आणि समस्या.
स्वातंत्र्यलढा- स्वातंत्र्य लढ्यातील विविध टप्पे आणि देशाच्या निरनिराळ्या भागांमधील स्वातंत्र्य लढ्यात योगदान देणारे महत्त्वाचे व्यक्ती व त्यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान.
स्वातंत्र्योत्तर एकत्रीकरण आणि देशांतर्गत पुनर्रचना.
जगाच्या इतिहासामध्ये १८ व्या शतकापासून औद्योगिक क्रांती, जागतिक युद्धे, देशांच्या भूसीमांची पुनर्रचना, वसाहतवाद, निर्वसाहतवाद, राजकीय तत्वज्ञान जसे की साम्यवाद, भांडवलशाही, समाजवाद इत्यादी. त्यांची रूपे व समाजावरील त्यांचा प्रभाव यांचा समावेश राहील.
भारतीय समाजाची ठळक वैशिष्टे आणि भारताची विविधता.
महिला व महिला संघटनांची भूमिका, लोकसंख्या आणि त्या संबंधित मुद्दे, दारिद्रय व विकासात्मक प्रश्न, नागरीकरण यांचेशी निगडीत समस्या व त्यावरील उपाययोजना.
जागतिकीकरणाचे भारतीय समाजावरील परिणाम.
सामाजिक सबलीकरण, जातीयवाद, प्रांतवाद आणि धर्मनिरपेक्षता.
जगाचा प्राकृतिक भूगोल व त्याची ठळक वैशिष्टे.
जागतिक प्रमुख नैसर्गिक साधनसंपत्तीचे वितरण, (दक्षिण आशिया व भारतीय उपखंड यांसह) जगातील विविध भागातील प्राथमिक, द्वितीय व तृतीय औद्योगिक सेवांच्या स्थानाला जबाबदार असणारे घटक (भारतासह).
भूकंप, त्सुनामी ,ज्वालामुखी हालचाली, चक्रिय वादळ इत्यादी अशा महत्त्वाच्या भूप्राकृतिक घटना, भौगोलिक वैशिष्टे आणि त्यांचे स्थान,महत्वाची भौगोलिक वैशिष्टे (जलाशये आणि हिमनग यांसह) तसेच वनस्पती आणि प्राणी यांच्यातील बदल व अशा बदलांचा परिणाम.

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

पेपर - ५ (२५० गुण)

सामान्य अध्ययन :- २

प्रशासन, संविधान, राज्यशास्त्र, सामाजिक न्याय व आंतरराष्ट्रीय संबंध महाराष्ट्राच्या काही भारांशासह

भारतीय संविधान- ऐतिहासिक पार्श्वभूमी, उत्क्रांती, वैशिष्टे, सुधारणा, महत्त्वपूर्ण तरतुदी आणि मूलभूत संरचना.
संघ व राज्ये यांची कार्ये व जबाबदाऱ्या संघराज्य रचनेशी संबंधित प्रश्न व आव्हाने, स्थानिक पातळीवर अधिकार आणि वित्त व्यवस्था यांचे प्रदान आणि त्यातील आव्हाने.
विविध अंगामधील अधिकारांची विभागणी, वाद निवारण यंत्रणा व संस्था.
भारतीय सांविधानिक योजनेची इतर देशांशी तुलना.
संसद व राज्य विधानमंडळे- संरचना, कार्यप्रणाली, कामकाज चालविणे, अधिकार व विशेषाधिकार आणि यांपासून उद्भवणारे प्रश्न.
कार्यपालिका, न्यायपालिका यांची रचना, संघटन आणि कार्ये, सरकारची मंत्रालये व विभाग, दबाव गट आणि औपचारिक/अनौपचारिक संघ आणि त्यांची राज्य व्यवस्थेमधील भूमिका.
स्थानिक स्वराज्य संस्था.
लोकप्रतिनिधित्व अधिनियमाची ठळक वैशिष्टे.
विविध सांविधानिक पदांच्या नियुक्त्या, विविध सांविधानिक मंडळाचे अधिकार कार्य व जबाबदाऱ्या.
वैधानिक, नियामक व विविध अर्धन्यायिक मंडळे.
विविध क्षेत्रांमधील विकासासाठी सरकारी धोरणे व घटक यांचे संकल्पन व अंमलबजावणी करताना उद्भवणाऱ्या समस्या.
विकास प्रक्रिया व विकास उद्योग-अशासकीय संघटना, स्वयंसहायता गट, विविध गट व संघ, देणगीदार, धर्मादाय संस्था, संस्थात्मक व इतर हित संबंधित व्यक्ती यांच्या भूमिका.
समाजातील दुबळ्या घटकांसाठी केंद्राच्या व राज्याच्या कल्याणकारी योजना आणि या योजनांची कामगिरी, यंत्रणा, कायदे, या दुबळ्या घटकांच्या संरक्षणासाठी व लाभासाठी गठीत केलेल्या संस्था व मंडळे.
आरोग्य, शिक्षण, मानव संसाधन यासारख्या सामाजिक क्षेत्र / सेवाशी निगडीत घटकांच्या विकास व व्यवस्थापन संबंधातले प्रश्न.
दारिद्रय व उपासमार यांच्याशी संबंधित प्रश्न.
प्रशासन, पारदर्शकता व उत्तरदायित्व, ई-प्रशासन:- उपयोजने, प्रतिमाने, यश, मर्यादा, व क्षमता यांबाबतचे महत्त्वाचे पैलू; नागरिकांची सनद, पारदर्शकता व उत्तरदायित्व आणि संस्थात्मक व इतर उपाययोजना.
नागरी सेवांची लोकशाही मधील भूमिका.
भारत आणि शेजारील राष्ट्र यांचे संबंध.
द्विपक्षीय, प्रादेशिक व जागतिक गट आणि भारताचा समावेश असणारे आणि/ किंवा भारताच्या हितसंबंधाला बाधा पोहोचवणारे करारनामे
विकसित व विकसनशील देशांच्या धोरणांचा व राजकारणाचा भारताच्या हितसंबंधांवर आणि भारतीय भांडवलदारांवर होणारा परिणाम.
महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय संस्था, अभिकरणे, मंच, त्यांची रचना व जनादेश.

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

पेपर - ६ (२५० गुण)
सामान्य अध्ययन :- ३
तंत्रज्ञान, आर्थिक विकास, जैवविविधता, पर्यावरण, सुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन महाराष्ट्राच्या काही भारांशासह

भारतीय अर्थव्यवस्था आणि नियोजनशी संबंधीत मुद्दे, साधनसंपतीचे एकत्रीकरण, वाढ, विकास व रोजगार.
सर्वसमावेशक वाढ व त्यातून उद्भवणाऱ्या समस्या.
सरकारी अर्थसंकल्प.
देशाच्या विविध भागातील मुख्य पिके व पीक पद्धती, विविध प्रकारचे सिंचन व सिंचन पद्धती, साठवण, शेती उत्पादनांची वाहतूक व विपणन, मर्यादा व संबंधित अडचणी, शेतकऱ्यांच्या सहाय्यासाठी ई-तंत्रज्ञान.
प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष शेती अनुदान आणि किमान आधारभूत किमतींशी संबंधित मुद्दे, सार्वजनिक वितरण प्रणाली - उद्दिष्टये, कार्यप्रणाली, मर्यादा, सुधारणा; शिलकी साठा व अन्नसुरक्षाची समस्या, तंत्रज्ञान मोहीम, पशुपालनाचे अर्थशास्त्र.
भारतातील अन्न प्रक्रिया आणि संबंधित उद्योग- व्याप्ती आणि महत्त्व, स्थान, प्रतिवाह व अनुवाह आवश्यकता, पुरवठा साखळी व्यवस्थापन.
भारतातील जमीन सुधारणा.
अर्थव्यवस्थेवर उदारीकरणाचे परिणाम, औद्योगिक धोरणातील बदल आणि औद्योगिक विकासावर त्यांचे परिणाम.
पायाभूत सुविधा: ऊर्जा, बंदरे, रस्ते, विमानतळ, रेल्वे इत्यादी.
गुंतवणूक प्रतिमाने.
विज्ञान व तंत्रज्ञान - घडामोडी व त्यांचे उपयोजन आणि दैनंदिन जीवनातील परिणाम.
विज्ञान व तंत्रज्ञानातील भारतीयांची कामगिरी; तंत्रज्ञानाचे स्वदेशीकरण आणि नवीन तंत्रज्ञान विकसित करणे.
माहिती तंत्रज्ञान, अवकाश, संगणक, रोबोटिक्स, सूक्ष्म तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान या क्षेत्रांमधील जागरूकता आणि बौद्धिक मालमत्ता हक्कांशी संबंधित समस्या.
संवर्धन, पर्यावरणीय प्रदूषण आणि अवनती, पर्यावरणीय आघात निर्धारण.
आपत्ती व आपत्ती व्यवस्थापन, आपत्ती जोखीम लवचिकपणा, लवचिक समाज.
विकास आणि उग्रवादाचा प्रसार यांच्यामधील दुवे.
अंतर्गत सुरक्षेसाठी आव्हाने निर्माण करण्यात बाह्य राज्य व गैरराज्य घटकांची भूमिका.
संप्रेषण जाळ्यामार्फत अंतर्गत सुरक्षेसाठी आव्हाने, अंतर्गत सुरक्षा आव्हानांमध्ये प्रसार माध्यमे व सामाजिक नेटवर्किंग साईटस्ची भूमिका, सायबर सुरक्षेच्या मूलभूत बाबी, आर्थिक गैरव्यवहार व त्यावरील प्रतिबंध.
सुरक्षा आव्हाने आणि सीमाक्षेत्रातील त्यांचे व्यवस्थापन, दहशतवादाबरोबर संघटित गुन्हेगारीचा संबंध.
विविध सुरक्षा दले आणि अभिकरणे व त्यांचे जनादेश.

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

पेपर ७ (२५० गुण)
सामान्य अध्ययन :- ४
नीतिशास्त्र, सचोटी आणि अभियोग्यता.

या अंतर्गत समाविष्ट असलेले प्रमुख विषय म्हणजे नीतिशास्त्र, सचोटी आणि योग्यता. या पेपरमध्ये उमेदवारांची सचोटी, सार्वजनिक जीवनातील समंजसपणा आणि समाजाशी व्यवहार करताना त्याला सामोरे जाव्या लागणाऱ्या विविध समस्या आणि संघर्षाबाबतच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टिकोनाशी संबंधित समस्यांबाबत उमेदवारांची वृत्ती आणि दृष्टिकोन तपासण्यासाठीच्या प्रश्नांचा समावेश असेल. यावरील प्रश्नांमध्ये पैलू निश्चित करण्यासाठी घटना अभ्यास (केस स्टडी) याचा वापर केला जाईल. पुढील स्थूल क्षेत्रांचा समावेश केला जाईल.

अभ्यासक्रम:
नीतिशास्त्र आणि मानवी परस्पराभिमुखता: मानवतेच्या नीतिमत्तेचे सार, निर्धारक आणि परिणाम, नैतिकतेचे परिमाण, नीतिशास्त्र - खाजगी आणि सार्वजनिक संबंधांमधील, मानवी मूल्ये, महान नेते, सुधारक व प्रशासक यांचे जीवन आणि शिकवण यांपासून धडे, मूल्ये रुजविण्यासाठी कुटुंब, समाज व शैक्षणिक संस्था यांच्या भूमिका.
अभिवृत्ती: घटक, संरचना, कार्य; त्याचा प्रभाव आणि विचार व वर्तन यांच्याशी संबंध. नैतिक आणि राजकीय अभिवृत्ती, सामाजिक परिणाम व पाठपुरावा.
नागरी सेवेसाठी अभियोग्यता आणि मूलभूत मूल्ये, सचोटी, नि:पक्षपातीपणा आणि पक्षीय निरपेक्षता, वस्तुनिष्ठता, सार्वजनिक सेवेसाठी समर्पण, सहानुभूती, सहिष्णुता आणि दुर्बल घटकांप्रती सहानुभूती.
भावनिक बुध्दांक - संकल्पना आणि त्याची उपयोगीता, प्रशासन आणि कारभारामध्ये त्यांची उपयुक्तता आणि उपयोजन.
भारत आणि जगातील नैतिक विचारवंतांचे आणि तत्वज्ञांचे योगदान.
लोक प्रशासनातील सार्वजनिक/ नागरी सेवा मूल्ये आणि नैतिकता: स्थिती व समस्या, सरकारी व खाजगी संस्थांमधील नैतिक चिंता आणि कोंडी; नैतिक मार्गदर्शनाचे स्त्रोत म्हणून कायदे नियम, विनियम व सदसद विवेकबुद्धी, उत्तरदायित्व आणि नैतिक शासन; शासनामध्ये नैतिकता आणि नैतिक मूल्यांचे बळकटीकरण; आंतरराष्ट्रीय संबंध आणि निधीकरणामधील नैतिक समस्या; निगम प्रशासन.
प्रशासनातील सभ्यता: लोकसेवेची संकल्पना; प्रशासन व सभ्यता यांचा तत्वज्ञानात्मक आधार, माहितीची देवाण-घेवाण आणि सरकारमधील पारदर्शकता, माहितीचा अधिकार, नीतिसंहिता, आचारसंहिता, नागरिकांची सनद, कार्यसंस्कृती, सेवाप्रदानाचा दर्जा, सार्वजनिक निधीचा विनियोग, भ्रष्टाचाराची आव्हाने.
वरील समस्यांवरील घटना अभ्यास.

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

पेपर- ८ (२५० गुण) व
पेपर-९ (२५० गुण)
वैकल्पिक विषय पेपर एक व दोन

उमेदवारास, वैकल्पिक विषयांच्या यादीमधील कोणताही वैकल्पिक विषय निवडता येईल

वैकल्पिक विषयांची यादी

(१)	कृषी
(२)	पशुसंवर्धन व पशुविज्ञान
(३)	मानवशास्त्र
(४)	जीवशास्त्र
(५)	रसायनशास्त्र
(६)	स्थापत्य अभियांत्रिकी
(७)	वाणिज्य व लेखाशास्त्र
(८)	अर्थशास्त्र
(९)	विद्युत अभियांत्रिकी
(१०)	भूगोल
(११)	भूशास्त्र
(१२)	इतिहास
(१३)	विधि
(१४)	व्यवस्थापन
(१५)	मराठी साहित्य
(१६)	गणित
(१७)	यांत्रिकी अभियांत्रिकी
(१८)	वैद्यक शास्त्र
(१९)	तत्त्वज्ञान
(२०)	भौतिकशास्त्र
(२१)	राज्यशास्त्र व आंतरराष्ट्रीय संबंध
(२२)	मानसशास्त्र
(२३)	लोकप्रशासन
(२४)	समाजशास्त्र
(२५)	सांख्यिकी
(२६)	प्राणी शास्त्र

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

(३) मानवशास्त्र (मराठी व इंग्रजी माध्यम)

	पेपर - एक (विषय सांकेतांक १०१३)
१.	१.१. मानवशास्त्राचा अर्थ, व्याप्ती आणि विकास
	१.२ इतर ज्ञानशाखांशी संबंध : सामाजिक शास्त्रे, वर्तन विषयक शास्त्रे, जैवशास्त्रे, वैद्यकीय शास्त्रे, भूशास्त्रे आणि मानव्य विज्ञान
	१.३ इतर ज्ञानशाखांशी मानवशास्त्राच्या मुख्य शाखा, त्यांची व्याप्ती व समर्पकता (अ) सामाजिक-सांस्कृतिक मानवशास्त्र (ब) जैविक मानवशास्त्र (क) पुरातत्वीय मानवशास्त्र (ड) भाषिक मानवशास्त्र
	१.४ मानवी उत्क्रांती व मानवाचा उदय (अ) मानवी उत्क्रांतीमधील जैविक आणि सांस्कृतिक घटक (ब) जैविक उत्क्रांतीचे सिध्दांत (डार्विन पूर्व, डार्विन, डार्विनोत्तर) (क) उत्क्रांतीचा संश्लेषणात्मक सिध्दांत, उत्क्रांतीवादी जीवशास्त्राच्या संज्ञा व संकल्पनाची संक्षिप्त रुपरेषा (डोलोचा नियम, कोप चा नियम, गॉसचा नियम, समातंरता, अभिसरण, अनुकूल उत्सर्जन आणि संकीर्ण उत्क्रांती).
	१.५ नरवानर गण वर्गी प्राण्यांची वैशिष्ट्ये, उत्क्रांतविषयक प्रवाह आणि नरवानर गण वर्गी प्राणी वर्गीकरण, नरवानर गण वर्गी प्राणी अनुकूलने, (वृक्षवासी व जमिनीवर राहणारे) वानरवर्गी प्राण्यांचे वर्गीकरण, वर्तन नरवानर गण वर्गी प्राण्यांचे तृतीयक व चतुर्थक काळातील जीवाश्म्; जिवंत असलेले मोठे नरवानर गण वर्गी प्राणी, मानवाचे आणि कपिंचे तौलनिक शरीररचनाशास्त्र, उभ्या स्थितीमुळे झालेले सांगडयातील बदल आणि त्याचे परिणाम.
	१.६ पुढील बाबींची जाति आनुवंशिकता स्थिती, वैशिष्ट्ये व भौगोलिक वितरण (अ) दक्षिण व पूर्व आफ्रिकेतील प्लायो-प्लीस्टोसीन होमिनीड –ऑस्ट्रॅलोपिथेसिन (ब) होमो इरेक्टस् : आफ्रिका (पॅरान्थ्रोपस), युरोप होमो इरेक्टस् (हायडेलबर्गेन्सिस), आशिया होमो इरेक्टस जावानिकस, होमो इरेक्टस पेकिनेन्सिस) (क) नीअँडरथाल मानव- ला शापेल ओ सें (अभिजात प्रकार) माऊंट कारमेल (प्रागतिक प्रकार) (ड) ऱ्होडेशियन मानव (इ) होमो सेपियन्स –क्रोमॅग्नॉन, ग्रीमाल्डी व शान्सीलाड
	१.७ जीवनाचे जैविक मूलाधार: पेशी, डीएनए संरचना व प्रतिरुपीकरण , प्रथिने संश्लेषण, जनुक, उत्परिवर्तन, गुणसूत्रे, आणि पेशी विभाजन.
	१.८ (अ) प्रागैतिहासिक पुरातत्वशास्त्राची तत्वे कालगणना: तौलनिक व निरपेक्ष कालगणना पध्दती. (ब) सांस्कृतिक उत्क्रांती- प्रागैतिहासिक संस्कृतीची विस्तृत रूपरेषा: (1) पुरापाषाणयुग (2) मध्यपाषाणयुग (3) नवअश्मयुग (4) कांस्यपाषाणयुग (5) ताम्रयुग (6) लोहयुग
२.	२.१ संस्कृतीचे स्वरूप : संस्कृती व नागरतेची संकल्पना व वैशिष्ट्ये, सांस्कृतिक सापेक्षतावाद लक्षात घेऊन स्वसंस्कृतिकेंद्रितता
	२.२ समाजाचे स्वरूप: समाजाची संकल्पना: समाज आणि संस्कृती: सामाजिक संस्था: सामाजिक गट; आणि सामाजिक स्तरीकरण.
	२.३ विवाह: व्याख्या व सार्वत्रिकता, विवाहाचे सामाजिक-सांस्कृतिक नियम, (अंतर्विवाह, बहिर्विवाह, अनुलोम विवाह, प्रतिलोम विवाह, निषिध्द समागम निषेध); विवाहाचे प्रकार (एक पतीपत्नीत्व)

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

	बहुपतीपत्नीत्व, बहुपतित्व, गट विवाह) विवाहाची कार्ये, विवाहाच्या चालिरीती (अधिमान्य, नियत आणि प्रतिषिद्ध), विवाह प्रदाने (वधूमूल्य व हुंडा)
	२.४ कुटुंब : व्याख्या व सार्वत्रिकता, कुटुंब, परिवार व पारिवारिक गट, कुटुंबाची कार्ये, कुटुंबाचे प्रकार (संरचना, रक्ताचे नाते, विवाह, निवास व उत्तराधिकार यांच्या दृष्टिकोनातून), शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि स्त्रीवादी चळवळी यांचा कुटुंबावरील परिणाम.
	२.५ नातेसंबंध: रक्तसंबंध आणि आप्तभाव, वंशपरंपरेची तत्वे व प्रकार (एकपक्षीय, दुहेरी, द्विपक्षीय उभयपक्षी), वंशपरंपरा गटांचे स्वरूप (वंशावळ, कूळ, भ्रातृक, समाज गट व नातेवाईक), नातेसंबधवाचक संज्ञा (वर्णनात्मक आणि वर्गीकरणानुसार) वंशपरंपरा, पितृत्व निश्चिती आणि मानार्थ पितृत्व निश्चिती, वंशपरंपरा आणि सख्यसंबंध.
३.	आर्थिक संघटना: आर्थिक मानवशास्त्राचा अर्थ, व्याप्ती व अन्वयार्थ, रूपवादी व वास्तववादी वादविवाद, समुदायातील उत्पादन, वितरण व विनियम (देवाणघेवाण, पुनर्वितरण व बाजार), शिकार व संग्रहण, मासेमारी, स्थलांतरित शेती, पशुपालन, बागकाम, आणि शेती यांवर असणारे उदरनिर्वाह यांच्या नियमनाची तत्वे, जागतिकीकरण आणि देशी आर्थिक पध्दती.
४.	राजकीय संघटना आणि सामाजिक नियंत्रण: टोळी, आदिवासी समाज, अधिपतिराज्य, साम्राज्य व राज्य; सत्ता, अधिकार व अधिमान्यता यांची संकल्पना; साध्या समाजातील सामाजिक नियंत्रण, कायदा व न्याय.
५.	धर्म: धर्माच्या अभ्यासाचा मानवशास्त्रीय दृष्टिकोन (उत्क्रांतिवादी, मानसशास्त्रीय व कार्यप्राधान्यवादी); एकेश्वरवाद आणि अनेकदेवतावाद, पवित्र व धर्मनिंदक, पुराणकथा आणि विधी; आदिवासी व कृषकवर्गीय समाजातील धर्माची रूपे (जडप्राणवाद, जडप्राणमयतावाद, क्षुद्रवस्तुपूजा, निसर्गवाद आणि देवकवाद) धर्म, जादू व विज्ञान यातील फरक, जादू –धार्मिक कार्याधिकारी (धर्मगुरू, देवऋषी, वैदू/भगत, चेटक्या आणि चेटकीण)
६.	मानवशास्त्रीय सिध्दांत: (अ) अभिजात उत्क्रांतिवाद (टेलर, मोर्गन व फ्रेझर) (ब) ऐतिहासिक विशिष्टतावाद (बोआस) प्रसारवाद, ब्रिटिश जर्मन व अमेरिकन (क) कार्यप्राधान्यवाद (मॅलिनोवस्की), संरचनात्मक- कार्यवाद रॅडक्लिफ ब्राऊन) (ड) संरचनावाद (लेव्ही स्ट्रॉस आणि ई. लीच) (इ) संस्कृती आणि व्यक्तिमत्व (बेनेडीक्ट, मीड, लिंटन, कार्डीनर व कोरा-धू-बोआ) (फ) नव-उत्क्रांतिवाद (चाईल्ड, व्हाईट, स्टिवार्ड, सॅहलिन्स् व सर्व्हिस) (च) सांस्कृतिक भौतिकवाद (हॅरिस) (छ) प्रतिकात्मक व अन्वयार्थक सिध्दांत (टर्नर, श्नायडर व गीर्टझ) (ज) बोधात्मक सिध्दांत (टेलर, कॉंक्लीन) (झ) मानवशास्त्रातील उत्तर आधुनिकतावाद.
७	संस्कृती, भाषा व संभाषण: भाषेचे स्वरूप, उगम व वैशिष्ट्ये, शाब्दिक व अ-शाब्दिक संभाषण, भाषा वापराचे सामाजिक संदर्भ.
८	मानवशास्त्रातील संशोधन पध्दती: (अ) मानवशास्त्रातील क्षेत्रिय कार्य परंपरा (ब) तंत्र, पध्दती व पध्दतिमीमांसा यांमधील भेद (क) माहिती संकलनाची साधने: निरीक्षण, मुलाखत, अनुसूची, प्रश्नावली, प्रकरणी अभ्यास, वंशवृक्ष पध्दती जीवन-इतिहास, तोंडी इतिहास, माहितीचे दुय्यम स्त्रोत, सहभागी पध्दती. (ड) माहितीचे विश्लेषण, अर्थउकल आणि सादरीकरण
९	९.१ मानवी अनुवंशशास्त्र: पध्दती आणि उपयोजन: मानवी आनुवंशिक तत्वांच्या अभ्यासाच्या पध्दती - कुटुंब अभ्यास (वंशावळ विश्लेषण, जुळयांचे अभ्यास, पाल्य बालक, सह-युग्म पध्दती, पेशीअनुवंशिकी पध्दती, गुणसूत्री व गुणसूत्ररचना विश्लेषण) जैव-रासायनिक पध्दती, प्रतिक्षमताशास्त्रीय पध्दती, डी.एन.ए. तंत्रज्ञान व पुन:संयोजी तंत्रज्ञाने.
	९.२ मानवातील मेंडेलीय अनुवंशशास्त्र - कुटुंब अभ्यास, मानवातील एकल घटक, बहुघटक, घातक, अल्पघातक आणि बहुजनक आनुवंशिकता.
	९.३ अनुवंशिक बहुरूपता व निवड याची संकल्पना, मेंडेलीयन लोकसमूह, हार्डी - वाइनबर्ग सिध्दांत; वारंवारीतेत बदल व खाली येण्याची कारणे - उत्परिवर्तन, विविक्तीकरण, स्थानांतरण, निवड,

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

	अंत:प्रजनन आणि जीनी अपवहन. रक्तसंबंधी व रक्तसंबंधी नसणारा समागम, जीन भार, रक्तसंबंधी आणि दूर भावंड विवाहाचे आनुवंशिक परिणाम.
	९.४ मानवातील गुणसूत्रे व गुणसूत्री विकृती, पध्दतीशास्त्र (अ) संख्यात्मक आणि संरचनात्मक विकृती, विकार. (ब) लिंग गूणसूत्री विकृती - क्लाईनफेल्टर (एक्सएक्सवाय), टर्नर (एक्स ओ) विशेष महिला (एक्सएक्सएक्स), मध्यलिंगी आणि इतर संलक्षणी विकार. (क) अलिंग गुणसूत्री विकृती संलक्षण-डाऊनचे संलक्षण पॅटाऊ, एडवर्ड आणि क्री- दू-शा संलक्षण. (ड) मानवी आजारातील आनुवंशिक ठसे, आनुवंशिक परिक्षण, आनुवंशिक समुपदेशन, मानवी डीएनए पार्श्वरेखन, जीन प्रतिचित्रण व जीनसंच अभ्यास.
	९.५ वंश व वंशवाद, बिगर-मापीय रूपकीय विभेदांचा व वैशिष्ट्यांचा जैविक आधार, आनुवंशिकता व परिस्थिती या संबंधात वांशिक निकष, वांशिक गुणविशेष, वांशिक वर्गीकरणाचे जैविक आधार, मानवातील वांशिक विभेद आणि वंश संकर.
	९.६ जीनी सूचक म्हणून वय, लिंग व लोकसंख्या विभेद: एबीओ, आरएच रक्तगट, एचएलए एचपी ट्रान्सफेरीन, जीएम, रक्त विकरे. शरीरक्रियात्मक वैशिष्ट्ये- हिमोग्लोबिन पातळी, शरीर मेद, स्पंदन दर, श्वसन कार्य आणि वेगवेगळ्या सांस्कृतिक व सामाजिक - आर्थिक गटांमधील ऐंद्रिय बोधन.
	९.७ पर्यावरणीय मानवशास्त्राची संकल्पना व पद्धती: जैविक — सांस्कृतिक अनुकूलन - आनुवंशिक व बिगर आनुवंशिक घटक. मानवाचा पर्यावरणात्मक तणावाला शरीरक्रियाशास्त्रीय प्रतिसाद : उष्ण वाळवंट, थंडी, समुद्रसपाटीपासून उच्च उंचीचे हवामान.
	९.८ साथरोगशास्त्रीय मानवशास्त्र : आरोग्य आणि आजार, संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य आजार, पोषणविषयक कमतरतेशी संबंधित आजार.
१०	मानवी वाढ व विकास यांच्या संकल्पना: वाढीच्या अवस्था- जन्मपूर्व, जन्म, अर्भक, शैशव पौगंडावस्था, प्रौढता, वृध्दावस्था:- वाढ व विकासावर परिणाम करणारे घटक - आनुवंशिक परिस्थितीकीय, जैवरासायनिक, आहार, सांस्कृतिक व सामाजिक, आर्थिक, वय होणे व वृद्धावस्था: सिद्धांत आणि निरीक्षणे- जैविक व कालक्रमानुसारी आर्युमान. मानवी शरीरयष्टी व देह प्रारूप वाढीचे अभ्यासाच्या अभ्यास पद्धती.
११	११.१ जननक्षमतेमध्ये रजोदर्शनारंभ, रजोनिवृत्ती आणि इतर जैविक घटनांचे महत्व, प्रजननशक्ती आकृतीबंध व विभेदक.
	११.२ जनसांख्यिकीय सिध्दांत-जैविक, सामाजिक व सांस्कृतिक.
	११.३ गर्भधारण क्षमता, प्रजननक्षमता, जननप्रमाण आणि मृत्यूप्रमाण यावर प्रभाव टाकणारे जीवशास्त्रीय व सामाजिक परिस्थितीकीय घटक.
१२	मानवशास्त्राचे उपयोजन: क्रीडा मानवशास्त्र, आहार विषयक मानवशास्त्र, संरक्षण व इतर साधन सामग्रीच्या संकल्पनेतील मानवशास्त्र, न्यायसहाय्य मानवशास्त्र, वैयक्तिक अभिनिर्धारण व पुनर्रचनेच्या अभ्यास पद्धती व तत्वे: उपयोजित मानवी आनुवंशशास्त्र - पितृत्व निदान, आनुवंशशास्त्र विषयक समुपदेशन आणि सुप्रजननशास्त्र, आजार व वैद्यकशास्त्र यामधील डीएनए तंत्रज्ञान, प्रजोत्पादक जीवशास्त्रातील सरोगसी सरोजेनेटिक्स व पेशी आनुवंशिकी.

	पेपर-दोन (विषय सांकेतांक १०१४)
१.	१.१ भारतीय संस्कृती व नागरतेची उत्क्रांती - प्रागैतिहासिक (पुराश्मयुगी, मध्यपाषाण युग, नवअश्मयुग आणि नवअश्मयुग — कांस्यपाषाणयुग) आद्य ऐतिहासिक युग (सिंधू नागरता) हडप्पापूर्व, हडप्पा आणि हडप्पोत्तर संस्कृती. आदिवासी संस्कृतीचे भारतीय नागरतेला योगदान.
	१.२ शिवालिक व नर्मदा खोऱ्याच्या (रामापिथेकस, शिवापिथेकस आणि नर्मदा मानव) विशेष संदर्भासह भारतातील पुरामानवशास्त्रीय पुरावे.

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

	१.३ भारतातील पुरातत्वीय मानवजातिवर्णन — पुरातत्व शास्त्र: पुरातत्वीय मानवजातिवर्णन संकल्पना: कला व हस्तकला उत्पादक समुदायांसह शिकार, चराई, मासेमारी, गुरे चारणारे आणि शेतकरी समुदायांमधील उत्तर जीवित्व आणि समांतरता.
२	भारताचे जनसांख्यिकीय चित्र- भारतीय लोकसंख्येतील मानवजातिय आणि भाषिक मूलतत्त्वे आणि त्यांचे वितरण भारतीय लोकसंख्या- तिच्या संरचनेवर आणि वाढीवर परिणाम करणारे घटक.
३	३.१ पारंपारिक भारतीय समाजप्रणालीची रचना व स्वरूप- वर्णाश्रम, पुरुषार्थ, कर्म, ऋण व पुनर्जन्म.
	३.२ भारतातील जात पद्धती- वर्ण व जातीची रचना आणि वैशिष्ट्ये, जात पद्धतीच्या उद्भावाचे सिद्धांत, प्रमुख जाती, जाती गतिशीलता, जात पद्धतीचे भविष्य, जजमानी पद्धती जनजाती- जाती सातत्य.
	३.३ पवित्र समुच्चय आणि निसर्ग- माणूस- परमात्मा समुच्चय.
	३.४ भारतीय समाजाच्या बौद्धवाद, जैनवाद, इस्लाम व ख्रिश्चनवाद यांचा प्रभाव.
४	भारतातील उदय, वाढ आणि विकास - १८ व्या, १९ व्या आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या विद्वान-प्रशासकांचे योगदान. आदिवासी व जात अभ्यासातील भारतीय मानवशास्त्रज्ञांचे योगदान.
५	५.१ भारतीय खेडे- भारतातील खेड्यांच्या अभ्यासाचे महत्त्व: एक सामाजिक प्रणाली म्हणून भारतीय खेडे, वसाहतीचे पारंपारिक व बदलते आकृतीबंध आणि आंतरजातीय संबंध, भारतीय खेड्यांतील कृषी भूमी विषयक संबंध, भारतीय खेड्यांवरील जागतिकीकरणाचा प्रभाव.
	५.२ भाषिक व धार्मिक अल्पसंख्यांक आणि त्यांचा सामाजिक, राजकीय व आर्थिक दर्जा.
	५.३ भारतीय समाजातील सामाजिक-सांस्कृतिक बदलांची देशीय आणि बाहेरील प्रक्रिया: संस्कृतीकरण पश्चिमात्यीकरण आधुनिकीकरण, लहान व मोठ्या परंपरांचा आंतर प्रभाव, पंचायती राज आणि सामाजिक बदल, माध्यमे व सामाजिक बदल.
६	६.१ भारतातील आदिवासींची स्थिती- आदिवासी लोकसंख्येचे जीवजनन वैविध्य, भाषिक व सामाजिक-आर्थिक वैशिष्ट्ये आणि त्यांचे वितरण.
	६.२ आदिवासी समुदायाच्या समस्या- जमीन अन्यसंक्रमण, गरीबी, कर्जबाजारीपणा, कमी साक्षरता, कमी शैक्षणिक सुविधा, बेरोजगारी, अर्धरोजगारी, आरोग्य व पोषण आहार.
	६.३ विकासात्मक प्रकल्प आणि त्यांचा आदिवासी विस्थापनेवरील परिणाम आणि पुनर्वसनाच्या समस्या. वन धोरणाचा विकास व आदिवासी. शहरीकरण व औद्योगिकरणाचा आदिवासी लोकसंख्येवरील प्रभाव.
७	७.१ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग यांच्या शोषणाच्या व वंचिततेच्या समस्या. अनुसूचित जमाती व अनुसूचित जातींकरिता घटनात्मक संरक्षणात्मक उपाययोजना.
	७.२ सामाजिक बदल आणि समकालीन आदिवासी समाज, आधुनिक लोकशाही संस्था, विकास कार्यक्रम आणि कल्याणकारी उपाययोजना यांचा आदिवासींवर आणि दुर्बल घटकांवरील परिणाम.
	७.३ वांशिकतेची संकल्पना, वांशिक संघर्ष व राजकीय विकास, आदिवासी समुदायांतील असंतोष, प्रादेशिकवाद व स्वायत्ततेची मागणी; खोटा-आदिवासीवाद. वसाहत काळ आणि भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासींमध्ये सामाजिक बदल.
८	८.१ हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, इस्लाम आणि इतर धर्मांचा आदिवासी समाजावरील प्रभाव.
	८.२ आदिवासी आणि राष्ट्र राज्य- भारतातील आणि इतर राष्ट्रातील आदिवासी समुदायांचा तौलनिक अभ्यास.
९	९.१ आदिवासी क्षेत्रांचा प्रशासकीय इतिहास, आदिवासी विकासाची धोरणे, योजना, कार्यक्रम आणि त्यांची अंमलबजावणी. आदिम प्राचीन आदिवासी गटांची संकल्पना, त्यांचे वितरण, त्यांच्या विकासासाठीचे विशेष कार्यक्रम. आदिवासींच्या विकासामध्ये बिगर शासकीय संघटनांचे योगदान.
	९.२ आदिवासी विकासामध्ये व ग्रामीण विकासामध्ये मानवशास्त्राची भूमिका.
	९.३ प्रादेशिकतावाद, सांप्रदायिकता आणि वांशिकता व राजकीय चळवळींच्या आकलनासाठी मानववंशशास्त्राचे योगदान.

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

(7) वाणिज्य आणि लेखाशास्त्र (माध्यम - मराठी व इंग्रजी)

पेपर -एक (विषय सांकेतांक १०२१)	
लेखांकन आणि वित्तीय लेखांकन, कर आकारणी व लेखा परीक्षण	
१	वित्तीय लेखांकन: लेखांकन म्हणजे आर्थिक माहिती प्रणाली; वर्तनवादी शास्त्रांचा प्रभाव. लेखांकन मानके, उदाहरणार्थ घसारा लेखांकन, स्कंद (मालसाठा), संशोधन व विकास परिव्यय, दीर्घकालीन बांधकाम करार, महसूल मान्यता, स्थिर मालमत्ता, आकस्मिकता, परदेशी विनिमय व्यवहार, गुंतवणुका आणि शासकीय अनुदाने, रोख प्रवाह विवरणपत्र, प्रति समभाग अर्जन (प्रति शेअर कमाई) भाग भांडवल व्यवहाराचे लेखांकन अधिलाभांश समभाग, अधिकार समभाग, कर्मचारी साठा विकल्प आणि प्रतिभूतींची पुन:खरीदीसह. कंपनीचे अंतिम लेखे तयार करणे व सादर करणे. कंपन्यांचे एकत्रीकरण, समावेशन आणि पुनर्रचना.
२	परिव्यय लेखांकन: परिव्यय लेखांकनाचे स्वरूप व कार्ये. परिव्यय लेखांकन प्रणालीचे संस्थापन. उत्पन्न मापनाशी संबंधित परिव्यय संकल्पना, लाभ नियोजन, परिवहन नियंत्रण व निर्णयन. परिव्ययांकनाच्या पध्दती: कार्य परिव्ययांकन, प्रक्रिया परिव्ययांकन, व्यवहार आधारित परिव्ययांकन. लाभ नियोजनाचे साधन म्हणून परिमाण- परिव्यय- लाभ संबंध. किंमत निर्धारण निर्णय, उत्पादन निर्णय, निर्मिती व खरेदी निर्णय, बंद करण्याचा निर्णय इत्यादी साठीचे साधन म्हणून वाढीव विश्लेषण/विभेदी परिव्ययांकन. परिव्यय नियंत्रण आणि परिव्यय गट यांची तंत्रे: नियोजन व नियंत्रणाचे साधन म्हणून अर्थसंकल्पन. प्रमाण लेखांकन व तफावत विश्लेषण. उत्तरादायित्व लेखांकन आणि विभागीय संपादणूक मापन.
३	कराधान: आयकर: व्याख्या. प्रकाराचा आधार; एकूण उत्पन्नाचा भाग न बनणारे उत्पन्न. विविध शीर्षाखालील उत्पन्नाच्या संगणनाच्या साध्या समस्या (केवळ व्यक्तींच्या) अर्थात वेतन, गृह संपत्तीपासून मिळणारे उत्पन्न, व्यापार किंवा व्यवसाय यापासूनचा नफा व लाभ, भांडवली लाभ, अन्य स्त्रोतांपासूनचे उत्पन्न, निर्धारितीच्या एकूण उत्पन्नात समाविष्ट अन्य व्यक्तींचे उत्पन्न. हानीची वजावट आणि हानी अग्रोषित करणे. स्थूल एकूण उत्पन्नापासूनच्या वजाती मूल्यवर्धित कर (व्हॅट) आणि सेवा करांशी संबंधित ठळक वैशिष्ट्ये/ तरतुदी.
४	लेखापरीक्षण कंपनी लेखापरीक्षा: विभाज्य लाभ, लाभांश, विशेष अन्वषणे, कर लेखापरीक्षा यांच्याशी संबंधित लेखापरीक्षा. अधिकोषण, विमा, नफाहेतूहीन संघटना आणि धर्मादाय सोसायट्या/ विश्वस्त संघटनांचे लेखापरीक्षण.
आर्थिक व्यवस्थापन, वित्तीय संस्था आणि बाजार	
१	वित्तीय व्यवस्थापन:- वित्तीय कार्य: वित्तीय व्यवस्थापनाचे स्वरूप, व्याप्ती व उद्दिष्टये: जोखीम व परतावा संबंध. वित्तीय विश्लेषणाची साधने: गुणोत्तर विश्लेषण, निधीरोख आणि प्रवाह - प्रवाह विवरणपत्र. भांडवली अर्थसंकल्पन निर्णय: प्रक्रिया, कार्यपद्धती आणि मूल्यांकन पद्धती. जोखीम व अनिश्चितता विश्लेषण व पद्धती. भांडवली परिव्यय: संकल्पना,भांडवलाच्या विनिर्दिष्ट परिव्ययांची आणि भारित सरासरी परिव्ययाची संगणना. समन्याय भांडवलाच्या परिव्यय निर्धारणाचे साधन म्हणून भांडवली मत्ता किंमत निर्धारण प्रतिमान (सीएपीएम). वित्तीय निर्णय: भांडवल संरचनेचे सिद्धांत-निव्वळ उत्पन्न (NI) दृष्टिकोन, निव्वळ कार्यवाहक उत्पन्न (NOI) दृष्टिकोन, एम एम (MM) दृष्टिकोन आणि पारंपारिक दृष्टिकोन. भांडवल संरचनेचे संकल्पचित्रण: कर्ज भांडवल गुणोत्तराचे प्रकार (कार्यवाहक, वित्तीय व संयुक्त) ईबीआयटी - ईपीएस विश्लेषण, आणि इतर घटक. अधिलाभांश निर्णय आणि व्यवसाय संस्थेचे मूल्यांकन: वॉल्टरचे प्रतिमान, एम एम प्रबंध, गार्डनचे प्रतिमान, लिंटनरचे प्रतिमान. अधिलाभांश धोरणावर परिणाम करणारे घटक. कार्यकारी भांडवल व्यवस्थापन: कार्यकारी भांडवलाचे नियोजन कार्यकारी भांडवलाचे निर्धारक घटक.

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

	कार्यकारी भांडवलाचे घटक: रोख, मालसाठा आणि प्राप्य विलीनीकरण व संपादनावर एकाग्र कंपनी पुनर्रचना (केवळ वित्तीय परिप्रेक्ष्य).
२	<u>वित्तीय बाजार आणि संस्था</u> भारतीय वित्तीय व्यवस्था: विहंगावलोकन. पैसा बाजार: सहभागी, संरचना व साधने व्यापारी बँका. बँकिंग क्षेत्रातील सुधारणा. भारतीय रिझर्व बँकेचे मौद्रिक व पत धोरण, नियामक म्हणून भारतीय रिझर्व बँक. भांडवल बाजार: प्राथमिक व दुय्यम बाजार. वित्तीय बाजार साधने आणि नवकारी कर्ज साधने, नियामक म्हणून सेबी. वित्तीय सेवा परस्पर निधी, साहस भांडवल, पतयोग्यता निर्धारण अभिकरणे, विमा आणि भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आयआरडीए).

पेपर - दोन (विषय सांकेतांक १०२२)	
संघटन सिद्धांत आणि व्यवहार, मानव संसाधन व्यवस्थापन आणि औद्योगिक संबंध संघटना सिद्धांत आणि व्यवहार	
१	<u>संघटन सिद्धांत:</u> संघटनेचे स्वरूप व संकल्पना; संघटनेची बाह्य सभोवतालची परिस्थिती- तंत्रज्ञानविषयक, सामाजिक, राजकीय, आर्थिक व विधीविषयक; संघटनात्मक ध्येये- प्राथमिक दुय्यम ध्येये, एकल व बहुविध ध्येये; उद्देशाधारित व्यवस्थापन. संघटन सिद्धांताचा विकास: सनातनवादी, नव सनातनवादी व प्रणाली उपगम संघटन सिद्धांताच्या आधुनिक संकल्पना: संघटनात्मक संकल्पन, संघटनात्मक संरचना आणि संघटनात्मक संस्कृती.
२	<u>संघटनात्मक संकल्पचित्र (आराखडा)-</u> मूलभूत आव्हाने: विकलन आणि संकलनाची प्रक्रिया, केंद्रीकरण व विकेंद्रीकरणाची प्रक्रिया, प्रमाणीकरण/ औपचारिकीकरण आणि परस्पर (अन्योन्य) समायोजन. औपचारिक व अनौपचारिक संघटनांचा समन्वय. यांत्रिकी व जैविक संरचना. संघटनात्मक संरचनांचे संकल्पन - प्राधिकार व नियंत्रण, अधिकारश्रेणी व कर्मचारी वर्ग कार्ये विशेषीकरण आणि समन्वय संघटना संरचनेचे प्रकार- कार्यात्मक. सारणी संरचना, प्रकल्प संरचना शक्तीचे स्वरूप व पाया, शक्तीचे स्त्रोत, शक्ती संरचना व राजकारण. संघटनात्मक संकल्पन (आराखडा) व संरचनेवरील माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव. संघटनात्मक संस्कृतीचे व्यवस्थापन करणे.
३	<u>संघटनात्मक व्यवहार :</u> अर्थ व संकल्पना; संघटनेत व्यक्ती: व्यक्तिमत्व, सिध्दांत, निर्धारक घटक; अवबोध अर्थ व प्रक्रिया. प्रेरणा: संकल्पना, सिध्दांत व उपयोजन, नेतृत्व – सिध्दांत व शैली. कार्यतीवनाची गुणवत्ता (क्यूडब्ल्युएल): अर्थ व त्याचा संपादणुकीवरील प्रभाव, त्याच्या वाढीचे मार्ग. गुणवत्ता चक्र (क्युसी) – अर्थ व त्याचे महत्व. संघटनांमधील विवादांचे व्यवस्थापन. देवघेव विश्लेषण, संघटनात्मक परिणामकारकता, बदलाचे व्यवस्थापन.
<u>२. मानव संसाधन व्यवस्थापन आणि औद्योगिक संबंध</u>	
१	<u>मानव संसाधन व्यवस्थापन (एचआरएम)</u> मानव संसाधन व्यवस्थापनाचा अर्थ,स्वरूप व व्याप्ती, मानव संसाधन नियोजन, कार्य विश्लेषण, कार्य वर्णन कार्य विशेषता, सेवाप्रवेश प्रक्रिया, निवड प्रक्रिया दिशा निदेशन आणि पदस्थापना प्रशिक्षण आणि विकास प्रक्रिया, कृती मूल्यमापन आणि ३६० प्रत्याभरण, मजुरी व वेतन प्रशासन, कार्य मूल्यमापन कर्मचारी कल्याण, पदोन्नत्या बदल्या व विभक्तीकरणे.
२	<u>औद्योगिक संबंध (आयआर):</u> औद्योगिक संबंधाचा अर्थ, स्वरूप, महत्व व व्याप्ती, व्यापार संघाची निर्मिती, व्यापार संघ विधिविधान, भारतातील व्यापार संघ चळवळ. व्यापार संघाची मान्यता, भारतातील व्यापार संघांच्या समस्या. व्यापार संघ चळवळींवर उदारीकरणाचा प्रभाव. औद्योगिक विवादांचे स्वरूप: संप व टाळेबंदी, विवादांची कारणे, विवाद प्रतिबंध आणि तडजोड. व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग: तत्वज्ञान, उपपत्ती, वर्तमान स्थिती आणि भावी संभाव्यता. न्यायनिर्णय आणि सामूहिक सौदाशक्ती. सार्वजनिक उपक्रमांमधील औद्योगिक संबंध, भारतीय उद्योगांमधील गैरहजेरी व श्रमिक उलाढाल आणि त्याची कारणे व उपाय. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना आणि तिची कार्ये.

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

(८) अर्थशास्त्र (माध्यम-मराठी व इंग्रजी)

पेपर-एक (विषय सांकेतांक १०२३)	
१	प्रगत सूक्ष्म अर्थशास्त्र:- (अ) किंमत निर्धारणाचा मार्शल आणि वॉलराँ यांचा दृष्टिकोन. (ब) वितरणाचे पर्यायी सिद्धांत- रिकार्डो, कॅल्डोर आणि कालेकी. (क) बाजार संरचना- मक्तेदारीयुक्त स्पर्धा, द्विजनाधिकार, अल्पजनाधिकार. (ड) आधुनिक कल्याणकारी निकष-पॅरेटो, हिक्स आणि स्किटोव्हस्की, ॲरोचे अशक्यता प्रमेय. ए .के. सेन यांचे सामाजिक कल्याण फलन.
२	प्रगत स्थूल अर्थशास्त्र: रोजगार, उत्पन्न व व्याजदर निर्धारणाचे दृष्टिकोन: सनातनवादी, केन्स (IS-LM) वक्र, नव सनातनवादी संश्लेषण व नवीन सनातनवादी, व्याजदर निर्धारणाचे सिद्धांत व व्याजदर संरचना.
३	पैसा- बँकिंग वित्त व्यवहार- (अ) पैशाची मागणी व पैशाचा पुरवठा: पैसा गुणक, पैशाचा संख्या सिद्धांत (फिशर, पिगू आणि फ्रीडमन) पैशाच्या मागणी विषयीचा केन्सचा सिद्धांत, बंदिस्त व मुक्त अर्थव्यवस्थेतील मौद्रिक व्यवस्थापनाची ध्येये व साधने. मध्यवर्ती बँक व कोषागार यांच्यातील संबंध. पैशाच्या वृध्दीदरावरील कमाल मर्यादेचा प्रस्ताव. (ब) सार्वजनिक वित्त आणि त्याची बाजार अर्थव्यवस्थेतील भूमिका: पुरवठ्यांच्या स्थिरीकरणात, संसाधनांचे वाटप आणि वितरण व विकासात भूमिका. शासकीय महसुलाचे स्त्रोत, करांची व अर्थसहाय्याची रूपे (प्रकार) त्यांचा आघात व परिणाम. कराधान, कर्जे, ऱ्हासमान प्रभाव यांच्या मर्यादा आणि कर्जाऊ घेतलेल्या रकमांसाठीच्या मर्यादा, सार्वजनिक खर्च आणि त्यांचे परिणाम.
४	आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र: (अ) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे जुने व नवीन सिद्धांत १. तुलनात्मक लाभ. २. व्यापारशर्ती व प्रस्ताव वक्र. ३. उत्पादन चक्र आणि धोरणात्मक व्यापार सिद्धांत. ४. व्यापार—आर्थिक वृध्दीचे अभियंत्र (इंजिन) आणि मुक्त अर्थव्यवस्थेतील अल्पविकसनाचे सिद्धांत. (ब) संरक्षणाची रूपे: प्रशुल्क व कोटा (क) आंतरराष्ट्रीय व्यवहार तोल समायोजन : पर्यायी दृष्टिकोन- १. किंमत विरुद्ध उत्पन्न, स्थिर विनिमय दरांतर्गत उत्पन्न समायोजन. २. धोरण मिश्रणाचे सिद्धांत. ३. भांडवल गतिशीलते अंतर्गत विनिमय दर समायोजन. ४. तरते दर आणि त्यांचा विकसनशील देशांसाठी असलेला अपेक्षित भार: चलन मंडळे. ५. व्यापार धोरण आणि विकसनशील देश. ६. मुक्त अर्थव्यवस्था स्थूल प्रतिमानात आंतरराष्ट्रीय व्यवहार तोल (BOP) समन्वय, समायोजने व धोरण समन्वय. ७. परिकल्पित आघात. ८. व्यापार गट आणि मौद्रिक संघ. ९. जागतिक व्यापार संघटना: ट्रिम्स् (TRIMS), ट्रिप्स् (TRIPS), देशांतर्गत उपायोजना, जागतिक व्यापार संघटनेच्या (WTO) वाटाघाटींच्या विविध फेऱ्या.

Follow @mpscmaterial and Visit mpscmaterial.com

५	<u>वृद्धी आणि विकास:</u> (अ) १. वृद्धीचे सिद्धांत: हॅरोडचे प्रतिमान, २. अतिरिक्त श्रमासह विकासाचे लेविसचे श्रमाधिक्य विकास प्रतिमान. ३. संतुलित व असंतुलित वृद्धी. ४. मानवी भांडवल आणि आर्थिक वृद्धी. ५. संशोधन व विकास आणि आर्थिक वृद्धी. (ब) अल्पविकसित देशांच्या आर्थिक विकासाची प्रक्रिया: आर्थिक विकास व संरचनात्मक परिवर्तनाबाबत मिर्डाल व कुझनेटस्: अल्पविकसित देशांच्या आर्थिक विकासामध्ये कृषी क्षेत्राची भूमिका. (क) आर्थिक विकास व आंतरराष्ट्रीय व्यापार आणि गुंतवणूक, बहुराष्ट्रीय महामंडळांची भूमिका. (ड) नियोजन आणि आर्थिक विकास, बाजारांची बदलती भूमिका आणि नियोजन खाजगी- सार्वजनिक भागीदारी. (ई) कल्याण निर्देशक आणि वृद्धीचे मापके- मानव विकास निर्देशांक मूलभूत गरजांचा दृष्टिकोन. (फ) विकास आणि पर्यावरणीय शाश्वतता- पुनर्नवीकरणीय आणि अपुनर्नवीकरणीय योग्य संसाधने, पर्यावरणीय ऱ्हास, आंतरपिढीय समन्यायी विकास.

	पेपर-दोन (विषय सांकेतांक १०२४)
	<u>स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय अर्थव्यवस्था:</u> भूधारणा पद्धती आणि त्यातील बदल, कृषिचे वाणिज्यीकिकरण, नि:सारणाचा सिद्धांत, निर्हस्तक्षेपतेचा सिद्धांत आणि मीमांसा. वस्तुनिर्माण आणि परिवहन (वाहतूक): ताग, कापूस, रेल्वे, मुद्रा व पत.
	<u>स्वातंत्र्योत्तर भारतीय अर्थव्यवस्था :</u>
अ.	**उदारीकरणपूर्व कालखंड**: १. वकील, गाडगीळ आणि व्ही. के. आर. व्ही. राव यांचे योगदान. २. कृषि: भूमी सुधारणा आणि भूधारणा पद्धती, हरितक्रांती आणि कृषि मधील भांडवल निर्मिती. ३. संघटन व वृद्धीतील उद्योग प्रवाह, सार्वजनिक व खाजगी क्षेत्राची भूमिका, लघु व कुटीर उद्योग. ४. राष्ट्रीय व दरडोई उत्पन्न: आकृतीबंध, प्रवाह, सकल व क्षेत्रीय घटक आणि त्यातील बदल. ५. राष्ट्रीय उत्पन्न व वितरण निर्धारित करणारे ठळक घटक, दारिद्र्याचे मापन (मोजमाप), दारिद्र्य व विषमतेतील कल.
